Vimp

५।१ ७३ (२) ५९८७

Pl. show to Secretary & Vice Ch.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : एसएसएन १०९७/७७०७/माशि-१

शालेय शिक्षण विभाग.

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक ७० जून, १९९७

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर.
औरंगाबाद, नागपूर

विषय : १९९७-९८ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत...

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाव्दारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

अ] या नवीन माध्यमिक शाळांना शासनाने विहित केलेल्या सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय राहिल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन संबंधित संस्थेला नवीन माध्यमिक शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२]. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार घालत असल्या-बाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा दाखल नाही.

६] माध्यमिक शाळा संहिता नियम २.८ मधील तरतुदीनुसार संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे.

७] शाळा सुरु करण्यास परवानगी दिल्याच्या ठिकाणी प्राथमिक शाळेतील इ. ७ वीच्या वर्गातील पटसंख्या किमान २० आहे, आदिवासी, डोंगराळ व अल्पभाषिक विभागासाठी किमान १५ आहे.

८] संस्थेने मागील तीन वर्षाचे प्रमाणित लेखा विवरणपत्रे सादर केली आहेत.

४. विहित शर्तींची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच सदर माध्यमिक शाळांना मान्यता दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

५. नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेल्या ठिकाणी असलेल्या प्राथमिक शाळेतील इ. ७ वीची पटसंख्या २० [आदिवासी, व अल्पभाषिक व डोंगराळ विभागासाठी १५] नसल्यास अशी प्रकरणे शासनाकडे तात्काळ पाठवावीत.

६. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

[ मि. य. मेता ]

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२] शिक्षणाधिकारी [माध्यमिक], जिल्हा परिषद
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
३] मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४] मा. शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव
५] मा. शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६] सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रत निवड नस्ती, कार्यासन माशि-१

ब) मंडळाच्या परीक्षेसाठी ज्या ज्या वेळेस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेची आवश्यकता असेल त्या त्या वेळी ती प्राधान्याने दिली पाहिजे. प्रचलित नियमानुसार परीक्षेचे काम हे आवश्यक व सक्तीचे असल्याने आवश्यक सेवकवर्ग उपलब्ध करुन दिला पाहिजे. परीक्षेच्या कामासाठी माध्यमिक शाळा, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी नकार देणार नाहीत व परीक्षेची सर्व कामे करणे त्यांच्यावर सक्तीचे राहील व त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपल्यावर राहील.

क) मंडळाने वेळोवेळी दिलेल्या विविध सूचना, नियम, परिपत्रके इत्यादींचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. तसेच यापुढील काळात मंडळातर्फे ज्या ज्या सूचना दिल्या जातील त्यांचे सातत्याने पालन केले पाहिजे. तसेच ज्या ज्या वेळेस मंडळाला परीक्षा संचालनाच्या कामास आपली मदत लागेल त्या त्या वेळी आपण ती प्राधान्याने दिली पाहिजे.

ड) परीक्षा केंद्रासाठी आपल्या शाळेची इमारत ज्यावेळी आवश्यक असेल ती उपलब्ध करुन देणे आपल्यावर बंधनकारक राहील.

इ) प्रत्येक वर्षी विनियम ४७(१२) प्रमाणे विहीत वेळेत रजिस्ट्रेशन फी भरुन मंडळास कळवावे अन्यथा ही मान्यता रद्द केली जाईल.

फ) माध्यमिक शाळाप्रमुखांनी नोंदणी शुल्काची रक्कम विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११ ००५ यांचे नावाने डिमांड ड्राफ्टने भरावी.

| | | |
|---|---|---|
| नोंदणी शुल्काचे दर पुढील आदेश होईपर्यंत पुढील प्रमाणे आहेत. | १) ३०० विद्यार्थी संख्येपर्यंत | रु. १५०/- दरवर्षी |
| | २) ३०१ ते १००० विद्यार्थीसंख्येपर्यंत. | रु. ३००/- --"-- |
| | ३) १००० च्या वर विद्यार्थीसंख्येस. | रु. ६००/- --"-- |

दरवर्षी शुल्काची रक्कम भरल्याशिवाय आपल्या शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयाचो विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत व त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहील याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,
(स्वाक्षरी) ६/१०/२०००
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५.

"मा. वि. सचिवांनी पत्राचा मूळ मसुदा मान्य केला आहे."

प्रत माहितीस्तव :--

१) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२) शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे / अहमदनगर / सोलापूर.

| ...चे नाव<br>२. | शाळेचे ठिकाण<br>३. | इयत्ता<br>४. | माध्यम<br>५. |
|---|---|---|---|
| **जिल्हा – पुणे** | | | |
| ...थ शिक्षण संस्था,<br>ता. खेड. | सोळू,<br>ता. खेड. | आठवी | मराठी |
| ...री-चिंचवड महानगरपालिका,<br>...री. | वाकड,<br>ता. मुळशी. | आठवी | मराठी |
| ...री-चिंचवड महानगरपालिका,<br>...री. | खराळवाडी. | आठवी | मराठी |
| ...जगद ज्ञानपीठ, भोर. | हिरडोशी, ता. भोर. | आठवी | मराठी |
| ...ग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी,<br>...णे. | वारजे,<br>ता. हवेली. | आठवी | मराठी |
| ...ारथी शिक्षण प्रसारक मंडळ,<br>...कराडे, पुणे. | केशवनगर, मुंढवा,<br>ता. हवेली. | आठवी | मराठी |
| महात्मा फुले वसतिगृह, पुणे. | शिवाजीनगर, पुणे. | आठवी | मराठी |
| ...महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे. | माळवाडी, हडपसर,<br>पुणे. | आठवी | मराठी |
| प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे. | भोसे, ता. खेड. | आठवी | मराठी |
| . विद्याप्रतिष्ठान कोथरुड, पुणे. | तुंग, ता. मावळ. | आठवी | मराठी. |
| **जिल्हा – रायगड** | | | |
| १. तांबे एज्युकेशन सोसायटी, मुंबई. | पहूर, ता. रोहा. | आठवी | मराठी |
| १२ जागृत सेवा संस्था, महाड. | कुर्ले, ता. महाड. | आठवी | मराठी. |

२...

Renuka Rangarekar (signature)
प्रभारी मुख्याध्यापिका